महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्र विकास प्राधिकरण
जनसंपर्क विभाग
कक्ष क्र. १९/२० तळ मजला, गृहनिर्माण भवन, कला नगर, वांद्रे पूर्व, मुंबई – ४०००५१.
दू.क्र. ०२२-६६४०५०६६/७७. ईमेल : cpromhadaoffice@gmail.com


==================================================================

जावक क्रमांक – ८०९ /८६ दिनांक :- ३० जून, २०२५

प्रसिद्धिपत्रक

**म्हाडा नाशिक मंडळातर्फे ३१ अनिवासी भूखंडांच्या ई-लिलावासाठी नोंदणी व अर्ज प्रक्रिया सुरू**

**०७ ऑगस्ट रोजी एकत्रित निकाल**

मुंबई, दि. ३० जून २०२५ :- म्हाडाच्या नाशिक गृहनिर्माण व क्षेत्र विकास मंडळाच्या अखत्यारीतील ३१ अनिवासी भूखंडांच्या विक्रीसाठी आयोजित ई-लिलावासाठी ऑनलाईन नोंदणी व अर्ज भरणा प्रक्रियेला महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्र विकास प्राधिकरणाचे (म्हाडा) उपाध्यक्ष तथा मुख्य कार्यकारी अधिकारी श्री. संजीव जयस्वाल (भा.प्र.से.) यांच्या हस्ते आज प्रारंभ करण्यात आला. या लिलाव प्रक्रियेतील एकत्रित निकाल ७ ऑगस्ट २०२५ रोजी जाहीर करण्यात येणार आहे.

वांद्रे पूर्व येथील म्हाडा मुख्यालयात झालेल्या या कार्यक्रमाला म्हाडाचे मुख्य अभियंता श्री. धीरजकुमार पंदिरकर, छत्रपती संभाजी नगर व नाशिक मंडळाचे मुख्य अधिकारी श्री शिवकुमार आवळकंठे आदी उपस्थित होते.

दि. ०६ ऑगस्ट, २०२५ रोजी सकाळी ११.०० वाजेपासून सायंकाळी ०५.०० वाजेपर्यंत संगणकीय प्रणालीमध्ये पात्र ठरलेल्या अर्जदारांसाठी ऑनलाइन बोली स्वरूपातील ई-लिलाव https://eauction.mhada.gov.in या संकेतस्थळावर होणार आहे. दि. ०७ ऑगस्ट, २०२५ रोजी सकाळी ११.०० वाजता https://mhada.gov.in व https://eauction.mhada.gov.in या दोन्ही संकेतस्थळांवर ई-लिलावाचा एकत्रित निकाल जाहीर करण्यात येणार आहे.

नाशिक मंडळातील अनिवासी भूखंडांच्या ई-लिलावामार्फत विक्रीसाठी ई-लिलाव प्रक्रियेत भाग घेण्यासाठी https://eauction.mhada.gov.in संकेतस्थळावर नोंदणी करणे, ऑनलाईन अर्ज करणे, कागदपत्रे अपलोड करणे, अनामत रक्कम ऑनलाईन भरणे यासाठी दि. ३० जून, २०२५ रोजी दुपारी १२.०० वाजेपासून ते दि. २९ जुलै, २०२५ रोजी रात्री ११.५९ वाजेपर्यंत मुदत देण्यात आली आहे. ई-लिलावाकरिता आरटीजीएस, एनईएफटीद्वारे अनामत रकमेचा भरणा दि. ३० जुलै, २०२५ रोजी संबंधित बँकेच्या कार्यालयीन वेळेपर्यंत करता येणार आहे.

सदर लिलावाबाबत विस्तृत पात्रता निकष, प्रत्येक भूखंडाचे विवरण, भूखंडाचे आरक्षण व अर्ज करण्याची कार्यपद्धती, सविस्तर अटी व शर्ती, ऑनलाईन अर्ज सूचना, माहितीपुस्तिका याबाबतची माहिती https://eauction.mhada.gov.in व https://mhada.gov.in या संकेतस्थळावरील Lottery>Eauction>eauction या पोर्टलवर उपलब्ध आहे. अर्जदाराने संकेतस्थळावरील व माहिती पुस्तिकेतील सविस्तर सर्व अटी व शर्ती काळजीपूर्वक वाचूनच अर्ज सादर करावा. अर्जदारास छपाई बाबतच्या कोणत्याही चुकीचा फायदा घेता येणार नाही, असे आवाहन नाशिक मंडळातर्फे करण्यात आले आहे.

###

(वैशाली गडपाले)
मुख्य जनसंपर्क अधिकारी / म्हाडा

---

**Maharashtra Housing & Area Development Authority**
Public Relations Department
Room No. 19/20, Ground Floor, Gruhnirman Bhavan, Kala Nagar, Bandra East,
Mumbai-400051. Email : cpromhadaoffice@gmail.com

==================================================

Outward No. : 809/86 Dt. June 30, 2025

**Press Release**

# Online Registration opens for e-Auction of 31 non-residential plots by MHADA Nashik Board

Bidding scheduled for 6 August; consolidated results to be declared on 7 August 2025

Mumbai, 30 June 2025: The Nashik Housing and Area Development Board, a regional unit under the Maharashtra Housing and Area Development Authority (MHADA), has commenced the online registration and application process for the e-auction of 31 non-residential plots. The initiative was formally launched today by Mr. Sanjeev Jaiswal, IAS, Vice President and Chief Executive Officer, MHADA.

The launch ceremony took place at MHADA Headquarters, Bandra (East), in the presence of Mr. Dheerajkumar Pandirkar, Chief Engineer, and Mr. Shivkumar Awalkante, Chief Officer of the Chhatrapati Sambhajinagar and Nashik Boards.

Eligible applicants may participate in the e-auction through the official portal https://eauction.mhada.gov.in between 11:00 AM and 5:00 PM on 6 August 2025. The consolidated results will be published at 11:00 AM on 7 August 2025 on https://mhada.gov.in and https://eauction.mhada.gov.in.

Registration, application submission, document upload, and earnest money deposit (EMD) must be completed between 12:00 PM on 30 June 2025 and 11:59 PM on 29 July 2025. EMD payments via RTGS/NEFT will be accepted until the close of banking hours on 30 July 2025.

Comprehensive information regarding eligibility criteria, plot specifications, reservation details, application guidelines, and terms and conditions is available under the E-auction section on both portals. Applicants are strongly advised to read the official brochure and instructions in full before submitting their entries. The Board has cautioned that no claims will be entertained on account of errors or omissions in printed content.

###

(Vaishali Gadpale)
Chief Public Relations Officer, MHADA

---


नाशिक गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ, नाशिक.
(म्हाडाच्या विविध योजनेतील व्यावसायिक, सुविधा भूखंडाचा ई-लिलाव )
म्हाडा
MHADA
३१ अनिवासी भूखंडाचा ई-लिलाव
नोंदणीचा शुभारंभ
GO LIVE
३० जून २०२५
https://eauction.mhada.gov.in/
विनीत
मा.श्री.शिवकुमार आवळकंठे
मुख्य अधिकारी ,नाशिक मंडळ
मा. ना. श्री. देवेंद्र फडणवीस
मुख्यमंत्री महाराष्ट्र राज्य.
मा. ना. श्री. एकनाथ शिंदे
उप मुख्यमंत्री तथा मंत्री, गृहनिर्माण,
महाराष्ट्र राज्य.
मा. ना. श्री. अजित पवार
उप मुख्यमंत्री महाराष्ट्र राज्य.
मा. ना. डॉ. पंकज भोयर
गृहनिर्माण राज्यमंत्री., महाराष्ट्र राज्य.
मा. श्री. असीम कुमार गुप्ता
अप्पर प्रधान सचिव, गृहनिर्माण विभाग,
महाराष्ट्र राज्य
मा. श्री. संजीव जयस्वाल
उपाध्यक्ष तथा मुख्य कार्यकारी अधिकारी,
म्हाडा.
मा. श्री. रंजन ठाकरे
सभापती, नाशिक गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ,
नाशिक.